नूतन वर्षाभिनंदन

# सेवक वार्ता

जानेवारी-२०२३ वर्ष -४, अंक-३

कार्यालय - वन ग्रंथालय, दुसरा मजला, वनभवन, गोखले नगर, पुणे - ४११०१६

**सा.व. विभाग कामांचे मुल्यांकन कामाची सेवक संघास प्राप्ती**

म. ग्रा. रो. ह. यो. द्वारा सामाजिक वनीकरण यंत्रणेने केलेल्या गट लागवड आणि बांधावरील लागवड कामांच्या मूल्यांकनासाठी दरपत्रके स्वीकृत होवून सेवक संघास मिळाले आहे. मिळवून दिले. या मुल्यांकन कामासंबंधी सा. व.

विभागाशी केलेल्या वाटाघाटीत श्री. पत्की सरांचे विशेष कौशल्याची झलक दिसून आली. प्रधान मुख्यवनसंरक्षक,सा.व.,पुणे यांनी मूल्यांकनासाठी निवडलेल्या विभाग व परिक्षेत्रातील लाभार्थिंची यादी पत्र क्र.कक्ष-२/योजना/प्र.क्र. ३/१४८२ /२०२२-२३,दि.१८-०१-२०२३ अन्वये पाठविली आहे. या यादी नुसार लाभार्थि रत्नागिरी, सिंधुदुर्ग, परभणी, जालना सा.व.विभागातील आहेत.या मूल्यांकन कामाचे सुधारीत वाटप करण्यात आले आहे.

विभाग परिक्षेत्र संख्या मू.सदस्य

रत्नागिरी सा.व.विभाग

१) रत्नागिरी १४ - आर.जी.राणे
२) देवरूख १४ - आर.जी.राणे
३) राजापूर १८ - व्ही.जी.डावरे
४) गुहागर २५ - पी.के.कुलकर्णी
५) गुहागर १६ - पी.ए.सुतळे
६) खेड १३ - पी.ए.सुतळे

रत्नागिरी एकूण:१००

सिंधुदुर्ग सा.व.विभाग

१) ६ परिक्षेत्रे २६ - सुभाष् पुराणीक

सिंधुदुर्ग एकूण:२६

परभणी, जालना सा.व.विभाग

१) परभणी सेलू १७ - जी.के.निकम
२) सेलू १७ - बी.आर.छल्लारे
३) मानवत १० - आर.टी.मोरे
४) गंगाखेड ६ - आर.टी.मोरे
५) जालना पातूर २७एस.के.गवळी
६) पातूर २० - पी.एच.वाघ.

मराठवाडा एकूण: ९७.

कोकण+मराठवाडा:२२३

१,१४,६११ रोपांची लागवड ७४ ग्रामपंचायत क्षेत्रात केली असून,प्रति ग्रामपंचायतीत १५५० रोपांची लागवड २२३ लाभार्थिंनी केली आहे.प्रति लाभार्थी सरासरी रोप संख्या ५०६ पेक्षा जास्त आहे

मग्रारोहयो मार्फत कृषी वानिकी कार्यक्रम सा.व.वि.ने गत ३ वर्षात राबविला आहे.त्याचे मूल्यांकन करण्याचे काम सेवक संघास मिळाले आहे.सुमारे १,१४,६६१ रोपे,२२३ लाभार्थिंनी,१७८.४७ हे.

क्षेत्रावर लागवड केली आहे व त्याचे मूल्यांकन करणेचे आहे.मूल्यांकन रकमेचा सौदा रु.आठ लाख ठरला आहे.

मूल्यांकन सदस्यांना पुढीलप्रमाणे खर्च मंजूर करण्यासाठी हा प्रस्ताव सादर केला आहे. सेवकचे अध्यक्षांनी मुल्यांकनासाठी शुल्क रु.चार प्रति रोप याप्रमाणे वितरण करण्यास मान्यता दिली आहे.

या शुल्कात मेहनताना, प्रवास खर्च, निवास व भोजन खर्च याचा समावेश आहे.

खर्च प्रति लागवड रोपासाठी-
मूल्यांकन मेहनताना: रु. २/-
प्रवास खर्च: रु.१/-
निवास व भोजन खर्च- रु.१/-
एकूण खर्च- रु.४/-


श्री. पत्की सर प्रकल्प मार्गदर्शक असून त्यांची गुगल फॉर्म व लिंक तयार करणे, डमी प्रात्यक्षिक इ. तयारी पूर्ण झाली आहे. काम १ फेब्रुवारी पासून सुरु करण्याचा इरादा आहे.

**मु. का. अ. महा-कॅम्पा यांचे मूल्यांकन काम पूर्ण**

सेवक संघाचे जेष्ठ सदस्य व अनेक कामांचे समन्वयक, मार्गदर्शक श्री. पत्की यांच्या प्रयत्नातून राज्यातील धुळे, ठाणे व नागपूर वनवृत्तातील पाणलोट क्षेत्र उपचार अंतर्गत - ६२९ हे. रोपवने २८ स्थळे, सामाजिक वनीकरण विभाग रस्ता दुतर्फा रोपवने -५२५ किमी. १७४ स्थळे , मृद-जल संधारण कामे - ९९ चे मूल्यांकन काम श्री. पत्की यांच्या देखरेखीत वेळेआधी पूर्ण झाले आहे. त्यात सर्वश्री एस. के. गवळी, जे.ए. पाटील,ए.एस.खुणे,एम.एस. पाटोळे, आर.जे.राणे, आर. एम. शास्त्री , एस. जी. पुराणिक, पी.ए. सुतळे, विवेक डावरे, बी. व्ही. सेलूकर, बी. आर. छल्लारे, बी. बी. जोमीवाले, पी. के. कुलकर्णी, जी. के. निकम, उमेश धोपेश्वरकर, आर. टी. मोरे, व्ही. आर. खनके, एस. ए. बत्तुलवार व पी. एच. वाघ सहभागी झाले होते. याकामी एनव्हीजन कॉम्प्युटर ट्रेनिंग इंस्टीट्यूट, पुणे यांचेव्दारा विकसित केलेली संगणकीय प्रणालीचा वापर करणेत आला. मुल्यांकन कामाची माहितीचे ऑनलाईन संकलन, करण्यात येवून पृथ्वकरणांती प्रारूप मुल्यांकन अहवाल लेखन करण्यात येत आहे. निष्कर्ष संगणकीय प्रणालीव्दारा करण्यात येईल.

SCAN AnyScanner

## श्री वसंत जोशी यांचे इंग्रजीत स्त्री संत साहित्यावर पुस्तक प्रकाशित




श्री वसंत जोशी यांचे तेरावे पुस्तक २६ जानेवारी २०२३ रोजी प्रकाशित झाले आहे. २०२३ च्या पहिल्या महिन्यात श्री वसंत जोशी यांचेकडून ही मोठी बातमी आहे. प्रकाशित झालेले हे श्री जोशी सरांचे तेरावे पुस्तक स्त्री संत साहित्यावर आधारित असून मराठी स्त्री संत साहित्याचे इंग्रजी भाषेत भाषांतर करण्यात आले आहे. त्याद्वारे मराठी भाषेतील स्त्री संतांचे वांड्मय कार्य जगभर प्रसिद्ध करण्याचा त्यांचे योगदान अतुलनीय आहे. त्याबद्दल सेवक संघातील सर्व सदस्यांनी त्यांचे कौतुक करत अभिनंदन केले आहे. त्यांनी वयाचे ९३ व्या वर्षी केलेल्या या कामास तोड नाही, ही विशेष कौतुकाची बाब आहे.

## सेवक संघाची आमसभा अमरावती येथे संपन्न

सन २०२१-२२ ची सर्व साधारण वार्षिक सभा २० जानेवारी २३ रोजी डॉ. पंजाबराव देशमुख प्रशासन व विकास प्रबोधिनी अमरावती विभाग, विद्यापीठ रोड अमरावती येथे श्री. शिरीश अस्थाना यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. कार्यक्रमास सर्वश्री. एन. रामबाबू, आयुक्त, राज्य लोकसेवा हक्क आयोग, अमरावती विभाग, जी. के. अनारसे, मुख्य वन संरक्षक, अमरावती, अजय पांढरे, संचालक, डॉ. पंजाबराव देशमुख प्रबोधिनी अमरावती, अमरावती हे मान्यवर उपस्थित होते.

### सन २०२३-२६ साठी सेवक संघाची नूतन केंद्रीय कार्यकारिणी खालीलप्रमाणे निवडण्यात आली.

1.विश्वास सावरकर: अध्यक्ष
2.मदन कुलकर्णी:कार्यकारी अध्यक्ष
3.शिरीष अस्थाना:सचिव
4. संभाजी गवळी: उपाध्यक्ष
5.शिवाजी भगत: उपाध्यक्ष
6.उ.धोपेश्वरकर: कोषाध्यक्ष
7.प्रदीप कुलकर्णी: सह सचिव
वृत्त स्तरावरील सहअध्यक्ष हे सदस्य असतील.

### कार्यक्रमाची रूपरेषा खालीलप्रमाणे होती

(१)सकाळी १०.०० ते १०.३० - पदाधिकारी परिचय व स्वागत.
(२) १०.३० ते १०.४५ - प्रास्ताविक - कार्यकारी अध्यक्ष -संघाची वाटचाल व नवीन संधी
(३) १०.४५ ते ११.१५ - सन २१-२२ खर्च मंजुरी व आर्थिक विश्लेषण - सचिव
(४) ११.१५ ते ११.३० - शाखा कार्य अहवाल २०२१-२२ - अमरावती, धुळे, पुणे, औरंगाबाद, नागपुर, चंद्रपूर
(५) ११.३० ते १२.१५ - सेवक संघ कार्य, जबाबदारी,पदाधिकारी निवड प्रक्रिया, शाखा पुनरुज्जीवन न होण्याची कारणे व त्यावर उपाय योजना, ठरविलेल्या उद्दिष्टपैकी किती व कोणते उद्दिष्ट साध्य झाले व जी उद्दिष्ट साध्य झाले नाही त्याची कारणे व त्यावरील उपाय योजना, यावर मंथन
(६) १३.०० ते १४.०० -भोजन
(७) १४.०० ते १५.०० - दुपारचा कार्यक्रम - स्थानिक निवृत्त वन अधिकारी व कर्मचारी आणि स्थानिक वन संरक्षक या पाहुण्यांचे स्वागत, परिचय व सेवक स्मृतिचिन्ह आणि औषधी वनस्पती प्रदान केल्या.
(८) १४.१५ ते १५.०० - सेवक संघ महाराष्ट्र व अमरावती शाखेचे कार्य परिचय - फोटो display सह. अमरावती शाखा सहअध्यक्ष श्री. संजय जगताप
(९) १५.०० ते १५.१५ -अध्यक्ष, श्री. शिरीष अस्थाना यांचे सेवक संघ महाराष्ट्र, वाटचाल बाबत संबोधन.
(१०) १५.१५ ते १५.३० - विशिष्ट व्यक्ती, संस्था यांचे विशिष्ट वन कार्याबद्दल सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह देवून सन्मान.
(११) १६.२५ ते १७.२५ - मान्यवरांचे संबोधन
(१२) १७.२५ ते १८.०० - आभार प्रदर्शन - सचिव अमरावती शाखा
(१३) १८.०० ते १८.१०- चहापान

क्षणचित्रे











कार्यक्रमाचे उद्घाटन दीप प्रज्वलन













वार्षिक सर्व साधारण सभा



मान्यवरांचे स्वागत





श्री. अजय पांढरे, संचालक, प्रबोधिनी अमरावती



जी. के. अनारसे, वन संरक्षक



वन कार्याबद्दल सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह देवून सन्मान





श्री. व्ही. टी. पत्कींचे मार्गदर्शन





सविस्तर वृत्तांत पुढील अंकात देणेत येईल.

AnyScanner

### धुळे शाखा विशेष उपक्रम

**नंदुरबार वन विभाग सामुहिक वन हक्क व्यवस्थापन आराखडे तयार करण्याबाबत अपडेट ......**

उप वन संरक्षक नंदुरबार वन विभाग यांचेकडून प्रायोगिक तत्वावर एकूण ५ गावांचे व्यवस्थापन आराखडे तयार करण्याचे कामाची प्रगती खालील प्रमाणे आहे.
तोरणमाळ, बिलमांजरे, असली, वाघाळे या ४ गावांचे व्यवस्थापन आराखडे जिल्हा स्तरीय समितीची मंजूरी घेण्यासाठी उप वन संरक्षक, नंदूरबार यांच्याकडे सादर करणेत आलेत. नवानगर गावास दिलेल्या वन हक्का संदर्भात स्थानिकांचे आक्षेपां -बाबत उप वन संरक्षक यांना अवगत केले होते. त्यांचेकडून प्रतिसाद न मिळाल्याने त्याबाबत जिल्हाधिकारी, नंदूरबार यांना पत्र देवून लक्ष वेधले आहे.

### निधन वार्ता

१) दि. २७-१२-२२ रोजी श्री. पद्माकर देशपांडे यांना देवाज्ञा झाली. त्यांचे अंत्यसंस्कार पुणे वैकुंठ स्मशानभूमी येथे करण्यात आले. ते १९६४-६६ च्या एसएफआरसी सत्रातील प्रशिक्षणार्थी होते.

२) अहमदनगर सामाजिक वनीकरण विभागातून जुलै २२मध्ये सेवानिवृत्त झालेले सवसं श्री कृष्णमोहन सोमासे यांचे दि. २९-१२-२२ रोजी रात्री पुणे येथे निधन झाले.

त्यांच्या आत्म्यास सद्गती प्राप्त होवो हीच ईश्वरचरणी प्रार्थना व सेवक संघातर्फे भावपुर्ण श्रध्दांजली.

### सेवक संघाचे मध्यवर्ती कार्यकारी मंडळाच्या बैठकीचा वृत्तांत

१.पाणलोट उपचार योजना व. सामाजिक वनीकरण विभाग अंतर्गत रस्त्यांचे दुतर्फा केलेल्या रोपवनांचे मूल्यांकन कामाची सद्यस्थिती व नियोजन- श्री. गवळी

२.म. ग्रा. रो. ह. यो. द्वारा सामाजिक वनीकरण यंत्रणेने केलेल्या रोपवन कामांचे मूल्यांकनासाठी दरपत्रके प्राप्त करणे बाबत- श्री.पत्की

३.जानेवारी २०२३ मधील सेवक संघाच्या वार्षिक आमसभेची पूर्वतयारी व खर्चाचा अंदाज- श्री. जगताप.

४.सेवकच्या नवीन कार्यकारणीची निवड पध्दती व प्रस्ताव मागविणे बाबत मार्गदर्शन-श्री. अस्थाना.

५. वन प्रशिक्षण संस्था, पाल व्यवस्थापनाबाबत चर्चा- श्री. गवळी.

६सेवकचे नवीन आजीवन सदस्य नोंदणीची प्रगती व नियोजन- श्री.मदन कुलकर्णी.

७.कै.एम.ए.बोडस आणि पै. जब्बार खान यांना श्रध्दांजली अर्पण केली.

८.ऐनवेळी उपस्थित होणाऱ्या विषयांवर चर्चा झाली.

### कॅम्पा अंतर्गत मूल्यांकनाचे मानधनाचे वितरण सुरू



प्रजासत्ताक दिनाचे मुहुर्तावर सेवक संघ धुळे शाखेचे अध्यक्ष श्री. एस. के. गवळी यांच्या हस्ते श्री छल्लारे आणि श्री. जी.के. निकम (धुळे शाखा सेवक सदस्य) यांनी महाराष्ट्रातील कॅम्पा कामांच्या मूल्यांकनासाठी केलेल्या कामांसाठी मानधनाचे धनादेश देण्यात आलेत.
इतर सदस्यांचे ऑनलाईन पध्दतीने करणेत येत आहे.







दिनांक 26 जानेवारी 2023 रोजी साजरा होत असलेल्या भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने आपणांस व आपल्या परिवारास हर्दिक शुभेच्छा !

**नूतन वर्ष २०२३ च्या सेवक संघाच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांना हार्दिक शुभेच्छा !!**

केवळ खाजगी वितरणासाठी
प्रकाशक-सेवक संघ, महाराष्ट्र,पुणे
संपादन - एस. के. गवळी

AnyScanner